# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTI DISCIPLINARY STUDIES

**Approved by : University Grant Commission (UGC)**

MONTHLY DOUBLE-BLIND PEER REVIEWED REFERRED OPEN ACCESS INTERNATIONAL JOURNAL

www.irjms.in

E-mail : irjms2015@gmail.com irjms.in@gmail.com

**Vol. IV, Special Issue -II, January, 2019 ISSN (Online): 2454-8499**

Impact Factor : 1.3599(GIF), 0.679 (IIFS)




INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES

IRJMS


Executive Editor
Prof. Tanaji Jadhav

Chief Editor
Dr. Mahendra Avaghade


Scanned with CamScanner

# International Research Journal of Multidisciplinary Studies

Chief Editor
Dr. Mahendra R. Avaghade

Executive Editor
Prof. Tanaji D. Jadhav

Published by
**IJRMS**
Sr. No. 397, Flat No. 7, 4 Sizan Society,
Bhugaon, Tal. Mulshi, Dist. Pune 412115

**Printed by**
**Anmol Graphics**
Flat No.3, Ojas Apartment
Sr.No.57/3B, NR, Morya Vihar, Kothrud, Pune 411038

Copyrights: Editors @2019
All Rights reserved

ISSN: 2454-8499 (Online)

Issue
Available at www.irjms.in

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| २४) | महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची भूमिका : एक अभ्यास | डॉ.तळेकर चंद्रशेखर |
| २५) | महाराष्ट्राच्या राजकारणातील बदलते नेतृत्व | डॉ. सुनिल पिंपळे |
| २६) | महाराष्ट्रातील मानवी स्थलांतर आणि विकासाचा प्रश्न | प्रा. डॉ.मोहन चौगुले |
| २७) | महाराष्ट्राच्या राजकारणातील बदलती समीकरणे | डॉ. रामकिशन लोमटे |
| २८) | आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : मा. शरद पवार | डॉ. बाळ कांबळे, प्रा. प्रदीप जगताप |
| २९) | महाराष्ट्राचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकास : वास्तवता | डॉ. संजय भोळे, डॉ. के. जी. पोकळे |
| ३०) | भाषावार प्रांतरचना आणि महाराष्ट्र : संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा विशेष संदर्भ | स्वप्निल बोधने |
| ३१) | महाराष्ट्रातील राजकीय संस्कृतीचे बदलते स्वरूप | डॉ. राजकुमार सुरवसे |
| ३२) | महाराष्ट्राच्या राजकारणातील समस्या | प्रा. जे. जी. गायकवाड |
| ३३) | महाराष्ट्राचे राजकारण आणि जात | डॉ संभाजी वारूंगळे पाटील |
| ३४) | महाराष्ट्राचे राजकारण : काँग्रेस वर्चस्व ते बहुपक्षीय स्पर्धा | प्रा. ऋतुराज बुवा |
| ३५) | महाराष्ट्रातील प्रमुख पक्ष व जातींचा राजकारणातील प्रभाव | प्रा. डॉ. व्ही. एच. भटकर |
| ३६) | स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील दलित नेतृत्वाचा राजकीय व्यवहार | प्रा. किर्तीकर भीमराव |
| ३७) | महाराष्ट्र राज्याच्या राजकारणातील बदलते नेतृत्व | शेख जब्बार खलील |
| ३८) | आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण | प्रा. कांतीलाल सोनवणे |
| ३९) | महाराष्ट्रातील स्थानिक राजकीय प्रक्रिया | डॉ. संतोष कायंदे |
| ४०) | आधुनिक महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राच्या विकासात यशवंतराव चव्हाणांची भूमिका | डॉ. कलिदास फड |
| ४१) | महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी घटक | प्रा.जयश्री शेंडे |
| ४२) | महाराष्ट्रातील आदिवासी चळवळ | डॉ. आर.के. काळे |
| ४३) | शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेचे स्त्री-स्वातंत्र्य चळवळीतील योगदान | प्रा. पाटील प्रमोद जगन्नाथ |
| ४४) | महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळ : एक अवलोकन | प्रा. किरण गायकवाड |
| ४५) | रोहिंग्या मुस्लिमांचा प्रश्न आणि भारताची भूमिका | दत्तात्रय जाधव |
| ४६) | मराठा आरक्षण | डॉ. मंजिरी कारेकर |
| ४७) | महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ | डॉ. हनुमंत फाटक, प्रा.अविनाश सावळकर |
| ४८) | महाराष्ट्रातील विडी कामगार चळवळी समोरील पेचप्रसंग | प्रा. राजू पांडे |
| ४९) | महिलांच्या समस्या आणि वाद | डॉ. दिनकर कळंबे |
| ५०) | महिलांचे मानवी हक्क : एक ऋजुतापूर्वक न्याय | डॉ. सुवर्णा गुडगे-बेनके |
| ५१) | भारतीय राजकारणात स्त्रीयांची भूमिका व योगदान विशेष संदर्भ :- महाराष्ट्र राज्य | डॉ.कदम हरिभाऊ |
| ५२) | पंचायतराज व्यवस्थेत महिला नेतृत्वाचा सहभाग | डॉ. विलास आघाव |
| ५३) | मंदिर प्रवेश - स्त्री हक्क | प्रा.डॉ.मनिषा कचवे |
| ५४) | महिला सबलीकरणात महाराष्ट्राची भूमिका | डॉ. प्रभाकर जगताप |
| ५५) | मानवी जीवनातील शिक्षणाचे महत्त्व | डॉ. संजय लांडगे |

Scanned with CamScanner

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
Vol. IV, Special Issue -II, January, 2019 ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

29

# महाराष्ट्राचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकास : वास्तवता

डॉ. संजय वामनराव भोळे
राज्यशास्त्र विभागप्रमुख, अ.र.भा. गरुड महाविद्यालय, शेंदुर्णी ता. जामनेर जि. जळगाव

डॉ. के. जी. पोकळे
संशोधन मार्गदर्शक व राज्यशास्त्र विभागप्रमुख,नवगण शिक्षण संस्था राजुरीचे कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा ता. जि. बीड

**प्रस्तावना :**

**भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताच्या सर्वांगिण विकासाचे स्वप्न देशाच्या सर्वच पातळीवर बघण्यात आले होते. त्यासाठी भारतामध्ये संविधानाची निर्मीती करून त्याव्दारे लोकशाही शासन व्यवस्थेची अंमलबजावणी करण्यात आली होती. संघराज्य पध्दतीच्या माध्यमातून केंद्रसरकार व राज्यसरकार यांच्यामध्ये अधिकाराची स्वतंत्ररीत्या विभागणी करून केंद्रसरकार व राज्यसरकार यांना स्वतंत्र अधिकार देण्यात आले आणि या आधारावर भारतातील प्रत्येक राज्य आपला विकास करण्याच्या मार्गाने वाटचाल करायला लागले.**

**महाराष्ट्र राज्याची पार्श्वभूमी :**

१ मे १९६० साली संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून महाराष्ट्र राज्याची निर्मीती झाली. महाराष्ट्र हे भारतातील पश्चिम भागातले एक राज्य आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्र भारतातील तीसरे व लोकसंख्येच्या बाबतीत दुसरे मोठे राज्य आहे. महराष्ट्र हे भारतातील सर्वात विकसनशिल राज्यापैकी एक आहे. महाराष्ट्र राज्याची सिमा गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा, कर्नाटक, गोवा आणि दादरा आणि नगर हवेली या केंद्रशीत प्रदेशाशी जोडलेले आहे. राज्याच्या पश्चिमेला अरबी समुद्राची किनार पट्टी आहे. जवळपास ११ कोटी लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्राची राजधानी मुंबई आहे. आणि मुंबईत साधारणत: १.८ कोटी लोक राहतात. महाराष्ट्राची उपराजधानी नागपूर शहर आहे. अशा महाराष्ट्रातील रहिवाश्यांना महाराष्ट्रीय अथवा मराठी माणूस असे संबोधतात.

मराठी ही महाराष्ट्राची अधीकृत भाषा आहे. त्यामुळे महाराष्ट्रात मराठी प्रामुख्याने बोलली जाते. त्याच प्रमाणे इंग्रजी,अहिराणी, कोकणी, मालवणी, वहाडी याही भाषा बोलल्या जातात. महाराष्ट्र राज्यात ७०.२ टक्के हिंदु, १५ टक्के बौध्द, १०.६ टक्के मुस्लीम, १.३ टक्के जैन, १ टक्के ख्रिश्चन धर्मीय जनता आहे. काही प्रमाणात महाराष्ट्रात ज्यु व पारशी धर्मीय देखील राहतात. या विकासाची जबाबदारी राज्याची असेल अशी भूमिका निश्चित केली. राज्य हे विकासाचे व सर्व सामान्याच्या कल्याणाचे साधन आसले पाहिजे ते केवळ सत्ताधारी किंवा भांडवलदार यांच्या हातातील बाहुले न बनता सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी राज्याने ठोस असे पाउले उचलून कल्याणकारी स्वरूपाचे कार्य करावे असेच सर्वसामान्याचे मत होते याच उद्देशाने संयुक्त महाराष्ट्राचा लढ्यमध्ये १०५ हुतात्म्यांनी आपले बलीदान दिले होते. कारण भारत हा बहुधर्मीय देश आहे. तसेच भारतात बहुल संस्कृतीचे लोक राहतात. त्याचप्रमाणे महाराष्ट्रामध्ये सुध्दा मराठी लोक बहुसंख्याकाने असले तरी महाराष्ट्रातही विविध जाती धर्माचे लोक आपले जीवन चांगल्या पध्दतीने जगण्याचा प्रयत्न करतात. अशा सर्वसामान्य लोकांच्या कल्याणासाठी सामाजिक, आर्थिक व राजकीय पातळीवर विकासाच्या योजना राबविणे हे देखील राज्याचे कर्तव्य असते. याचा आढावा योग्य पध्दतीने घेउन त्यांची वास्तवता जाणून घेणे आज काळाची गरज झाली आहे. कारण आज महाराष्ट्रात लोककल्याणाच्या नावावर सामाजिक, आर्थिक व राजकीय पातळीवर लोकांच्या मनात स्वार्थ केंद्रीत भावना निर्माण होऊन प्रचंड प्रमाणात राजकीय, आर्थिक व सामाजिक विषमतेची दरी निर्माण होत असल्याचे आपणास दिसून येत आहे. हे भारताच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने व कल्याणकारी महाराष्ट्राच्या दृष्टीने अयोग्य आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्यासोबत काम करणाऱ्या घटनाकारांनी तसेच राजकीय, सामाजिक चळवळींच्या नेत्यांनी समतेचे स्वप्न बघीतले होते, परंतु आज मात्र राजकीय, सामाजिक व आर्थिक पातळीवर प्रचंड प्रमाणात विषमतेची दरी निर्माण होतांना आपणास दिसत आहे. देशात आणि प्रामुख्याने महाराष्ट्रात भांडवलदार लोकांचे व त्यांच्या जोडीला राजकीय सत्ताधाऱ्यांचेच एकतर्फी वर्चस्व आपणास दिसत आहे.

राजकीय सत्ताधारी व भांडवलदार या दोन घटकामुळे सर्वसामान्य माणूस भरडला जात आहे. कारण आजही भांडवलशाही व्यवस्था शोषणाच्या माध्यमातून वाटचाल करत आहे आणि राजकीय सत्ताधारी सुध्दा केवळ आश्वासनाच्या जोरावर सर्वसामान्य माणासाची दिशाभूल करून लूट करत आहे. म्हणून अशी रचना बदलल्याशिवाय महाराष्ट्राच्या

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
Vol. IV, Special Issue -II, January, 2019 ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

कल्याणकारी राज्याचे स्वरूप पूर्ण होऊ शकणार नाही. हे शाश्वत सत्य आहे. कारण आजही महाराष्ट्रात स्त्रि-पुरुष विषमता या माध्यमातून स्त्रिभृणहत्या, हुंडाबळी, आर्थिक दारिद्र्यातून शेतकऱ्याच्या वाढत्या आत्महत्या याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. याला कुठेतरी थांबवायचे असेल तर महाराष्ट्राच्या सामाजिक,आर्थिक व राजकीय पातळीवर योग्य बदल होणे अपेक्षित आहे. अन्यथा पुरोगामी महाराष्ट्रात सर्व सामान्य माणसाला आपले जीवन जगणे व आपल्या स्वातंत्र्याचा उपभोग घेणे हे केवळ मृगजळासारखे होईल. याचाही सर्वच पातळीवर गांभीर्याने विचार होणे काळाची गरज आहे.

याच अनुषंगाने प्रस्तूत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासाच्या महत्त्वपूर्ण अशा पैलुवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :**

१. स्वातंत्र्यानंतरच्या काळात पुरोगामी महाराष्ट्राच्या असणाऱ्या वास्तव परिस्थितीचा अभ्यास करणे. २. महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीची वास्तवता स्पष्ट करणे. ३. कल्याणकारी राज्य म्हणून महाराष्ट्राची आजची वाटचाल स्पष्ट करणे. ४. कल्याणकारी राज्यामध्ये राजकारण व समाजकारण यांची आज कशी सांगड आहे याचा आढावा घेणे. ५. भारतीय राज्य घटनेसमोरील स्वातंत्र्य, समता व न्याय बंधुता या तत्वाचा अवलंब महाराष्ट्रात आहे का ? याचा महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने विचार करणे.

**सामाजिक बदल, सामाजिक विषमता :**

आज महाराष्ट्रामध्ये फुले, शाहु आंबेडकरांचा वारसा जीवंत नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात सामाजिक विषमतेची दरी निर्माण झालेली दिसत आहे. जाती, पातीच्या बंधनामुळे समाजासमाजामध्ये संघर्ष निर्माण होऊन माणूस माणसापासून विभक्त होतांना आपणास दिसत आहे.

जातीय सलोखा निर्माण होण्यासाठी आज कोणत्याही सामाजिक पातळीवर प्रयत्न फारसे दिसत नाहीत. पुरोगामी महाराष्ट्र म्हणून केवळ विचाराच्या पातळीवर सगळीकडे चर्चा होत असते परंतु वास्तवात मात्र आज सर्वच सामाजिक पातळीवर प्रत्येक समाज आपल्याला श्रेष्ठ समजत आहे. आणि त्यामुळे फुले, शाहु, आंबेडकरांना अभिप्रेत असणारी समतोल समाज रचना निर्माण होणे दुरापास्त झाले आहे.

**धार्मिक संघर्ष व अनेक लष्करवादाला खतपाणी :**

पुरोगामी महाराष्ट्रामध्ये संत, समाजसुधारक व बऱ्याच नेत्यांनी धार्मिक एकोपा व ईश्वर हा एकच आहे असा व्यापक विचार रुजविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु वास्तवामध्ये मात्र हा विचार बाजूला सारुन प्रतिगामी चळवळी उदयाला येतांना आपणास दिसत आहे. त्यातूनच वाढती अंधश्रध्दा, नरबळी, धार्मिक अंधश्रध्दा, धार्मिक श्रेष्ट कनिष्ठता याला खतपाणी मिळत आहे. अशा या विचारामुळे महाराष्ट्रातील समाजरचना अंधश्रध्दा बनून अधोगतीला जात आहे. सामाजिक व राजकीय पातळीवर देखील अशा विचाराला खतपाणी मिळत असल्यामुळे आज गोविंद पानसरे, नरेंद्र दाभोळकर यांची हत्या झाल्याची आपणास दिसून येते.

याबरोबरच महाराष्ट्रात आज अनेक धार्मिक अंधश्रध्दाळु लोक अनेकांच्या जीवावर उठतात व त्यातून माणसांच्या हत्या होतात. अशी अनेक उदाहरणे आपणास देता येतील. म्हणून असा विचार थांबणे ही काळाची गरज झाली आहे. कारण एकीकडे महाराष्ट्रात विकासाच्या गोष्टी केल्या जातात. तर त्या विकासाची वास्तवता बघितली तर विकास केवळ मृगजळ आहे. असे आपणास दिसून येते.

**जात व राजकारण यांचे समिकरण :**

आज महाराष्ट्रात सुध्दा जाती पातीचे राजकारण झाल्यामुळे केवळ कोणत्या जातीची जनसंख्या आधिक त्याचे राजकारणात प्राबल्य असे समिकरण झाले आहे.

खऱ्या अर्थाने कल्याणकारी राज्या मध्ये विकासाच्या निकषावार लोकप्रतिनिधीची निवड असावी असे महात्मा गांधीजींचे मत होते. त्याप्रमाणे जर भविष्यात बदल झाला नाही तर निवडणूका व लोकप्रतिनिधी यांना काहीच महत्त्व उरणार नाही ही आजची वास्तवता आहे. राजकीय व सामाजिक मुद्यावरच, आज राजकीय संतोष आहे. जातीपातीच्या व राजकारणा बरोबरच आरक्षणाच्या मुद्यावर जास्त विचार होत आहे ही बाब सुध्दा कल्याणकारी राज्यासाठी धोकादायक आहे.

**आर्थिक बदल, आर्थिक विषमता :**

महाराष्ट्रामध्ये आज गरीबी, दारिद्र्य, उपासमार, बेराजगारी व बेकारी यांनी उचांक गाठला आहे. वाढत्या लोकसंख्येचा विचार करता असे दिसून येते की, लोकसंख्येच्या प्रमाणात लोकांच्या रोजगाराच्या समस्या सुटलेल्या नाहीत. त्यामुळे बेराजगारी व बेकारी यांनी सर्व सामान्य जनता होरपळत आहे. रोजगारी या समस्यामुळे सर्वसामान्य जनतेला मुंबई सारख्या महानगरामध्ये जाऊन वेठबीगारी काम करावे लागतात. त्याचे उदाहरण म्हणजे त्यामुळे निर्माण झालेली धारावी झोपडपट्टी आहे. जीचा उल्लेख आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणून केला जातो.

यामुळे चोरी, दरोडेखोरी, वाटमारी, लुटमारी यांनी

Scanned with CamScanner

त्यांक गाठला आहे. असे जर सातत्याने होत राहिले तर महाराष्ट्राचा विकास होण्याऐवजी महाराष्ट्राची खुरी संस्कृती लयास गेल्याशिवाय राहणार नाही. या दृष्टीने सामाजिक, आर्थिक व राजकीय पातळीवर विचार होणे आवश्यक आहे.

**राजकीय अस्थैर्य :**

कल्याणकारी राज्याचा विकास व्हायचा असलेतर कोणत्याही राज्यामध्ये राजकीय स्थैर्य असणे आवश्यक असते. कारण राज्याच्या विकासाचा महत्त्वाचा घटक म्हणजे राजकीय सत्ता म्हणजेच शासन होय. परंतु महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर साधारणत: १९६७ पासून महाराष्ट्र राज्यात शासनाची अस्थिरता सातत्याने आपणास दिसते याबरोबरच हे अस्थिर शासन जेव्हा सत्तेवर असते. तेव्हा लोकांना विकासाचे आश्वासन देऊन सत्तेवर आलेले असते. परंतु सत्तेवर असतांना ठोस धोरण आखून जनतेच्या हितासाठी त्यांची अंमलबजावणी करत नाही, किंबहुना त्यांना तशी संधीच मिळत नाही. त्यामुळे राज्याला विकासापासून वंचीत राहावे लागते. आणि आपन सर्वलोक त्याला कल्याणकारी राज्य म्हणू लागतो. हे मृगजळ आहे. आज या कल्याणकारी राज्यामध्ये हाजारो शेतकरी आत्महत्या करत आहेत. जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी शेतात राबराब राबतो परंतु त्याने कष्टाने पीकवलेल्या मालाला शासनाकडून योग्य भाव मिळत नाही. आणि असा शेतकरी कर्जबाजारी होतो आणि आत्महत्या करतो. हे महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय लज्जास्पद आहे. आणि याला आपन विकसित महाराष्ट्र म्हणू शकत नाही.

**भांडवलशाही व्यवस्थेचा पगडा :** भांडवलशाही व्यवस्था ही शोषण करणारी स्वार्थ केंद्रीत अर्थव्यवस्था असते. हे ओळखून भारताचे पहीले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला होता. कारण यामध्ये सर्वसामान्याचे हीत व आर्थिक विषमता कमी करणे हे प्रमुख ध्येय होते. परंतु आज महाराष्ट्राच्या पातळीवर बघीतले तर राजकीय सत्ता सुध्दा भांडवल दाराच्या दावणीला बांधली गेल्यामुळे ही भांडवलशाही व्यवस्था आहे की लोकशाही व्यवस्था आहे या बद्दल आपल्या सर्वसामान्यांच्या मनात साशंकता निर्माण झाली आहे. यामध्ये शंका नाही.

म्हणून आज महाराष्ट्रातील आणि एकूणच भारतातील सर्वसामान्य लोकांना राजकीय व्यवस्थेबद्दल काहीच आस्था वाटत नसल्याचे दिसते. राजकीय दृष्टीने त्याला राजकीय उदासीनता म्हटल्या जाते.


**मूल्याधिष्ठीत राजकारण व समाजाभिमूख राजकारण : कालबाह्य :**

आज खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात मूल्याधिष्ठीत राजकारण आणि व त्यांच्या जोडीला आवश्यक असणारे समाजाभिमुख राजकारण करणारे नेते राहीले नाहीत. राजकारणाच्या पातळीवर लोकप्रतीनिधींनी सत्तेसाठी राजकारण न करता सत्तेच्या माध्यमातून समाजाचे कल्याण झाले पाहिजे या दृष्टीने राजकारण करणे गरजेचे आहे परंतु आज सर्व सामान्य पातळीवर राजकारण करणारा नेता सुध्दा केवळ सत्तेसाठी राजकारण एवढेच उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून कार्य करत असल्यामुळे राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाले आहे. आणि गुन्हेगाराचे राजकारण देखील झाल्यामुळे राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण होण्याचा प्रयत्न सातत्याने होत आहे.

**सारांश :** अशा प्रकारची अराजकता कमी करायची असेल तर लोक, जनता प्रतिनिधी, शासन व प्रशासक यांनी सर्वांनीच लोककर्तव्यांची व कल्याणकारी राज्याची भूमिका घेऊन कार्य करणे आवश्यक आहे. एकंदरीतच महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासाच्या संदर्भात प्रस्तुत कालखंडातील वास्तवता लक्षात घेतल्यास असे दिसून येते की संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील प्रदिर्घ अशा काळातील लढ्यामध्ये अनेक थोर नेत्यांनी दिलेले महत्वपूर्ण योगदान व त्यांना अपेक्षित असलेला महाराष्ट्राचा विकास आज आपणास दिसत नाही. तर आजचा महाराष्ट्र हा कल्याणकारी राज्याऐवजी अराजकतेच्या वाटेने जाईल काय ? अशी भीती सर्व सामान्य जनतेच्या मनामध्ये सातत्याने निर्माण होत आहे. यासाठी राज्याने केवळ जनतेचे संरक्षण करून उपयोग नाहीतर लोकांच्या मुलभूत प्रश्नांकडे जाणीव पूर्वक लक्ष देवून त्या सोडवणे अपिप्रेत असते. तरच त्याला कल्याणकारी राज्य म्हणता येईल ही आजच्या महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासाच्या दृष्टीने वास्तवता असेल.

**संदर्भ :**

१. डॉ.प्रकाश पवार, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना, प्रतीमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती मार्च २००१
२. महाराष्ट्रातील समाजसुधारक, के. सागर पब्लीकेशन पुणे, २०००
३. धनंजय कीर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पाप्युलर प्रकाशन मुंबई, पाचवी आवृत्ती १४ एप्रील २०१६
४ प्रा.के.आर.बंग, महाराष्ट्राची प्रशासकीय व्यवस्था, विद्याबुक पब्लीशर्स, औरंगाबाद चौथी आवृत्ती जून५.
५.टी. फडके, पक्षांतराचे राजकारण, अक्षर प्रकाशन पुणे, पहिली आवृत्ती २००१



IRJMS

www.irjms.in

# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTI DISCIPLINARY STUDIES


MONTHLY DOUBLE-BLIND PEER REVIEWED REFERRED OPEN ACCESS INTERNATIONAL JOURNAL

ISSN : 2454-8499 (Online) Impact Factor : 1.3599(GIF), 0.679 (IIFS)



International Research Journal of Multidisciplinary Studies is Seeking Scholars. Those who are Interested in our Serving as our volunteer additional review board. If u are interested Please send us your biodata applicants must have decorate and significant publishing work.



Published by :

**IRJMS**

Sr. No. 397, Flat No. 7, 4, Sizan Society, Bhugaon,
Tal. Mulshi, Dist. Pune - 412115.
Website : www.irjms.in E-mail : irjms2015@gmail.com, irjms.in@gmail.com
Mobile No. : 9823131575, 9028311410, 9766264309.

Design & Printed by : Anmol Graphics, Pune Mob. 8888563815



Scanned with CamScanner